कृष्णा एक्सप्रेस
www.krishnaexpress.in
24 Sep 2026 - Page 2

# गणरायाच्या साक्षीने सुरक्षेचा जागर; १५० महिलांना सायबर सुरक्षेचे धडे



कराड : जयजवान श्री गणेश मंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित महिला उपक्रमात सुमारे १५० महिलांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. क्विक हीलच्या सहकार्याने सायबर वॉरियर्स आर्यन कालेकर व आदित्य कालगांवकर यांनी हा जनजागृती उपक्रम राबविला. मंडळाच्या वतीने महिलांसाठी 'होम मिनिस्टर'सह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिलांशी संवाद साधत ऑनलाइन फसवणूक, यूपीआयद्वारे होणारे गैरव्यवहार, ओटीपी व संकेतशब्दांची सुरक्षितता, बनावट दूरध्वनी व संदेश, संशयास्पद दुवे तसेच सामाजिक माध्यमांवरील खाती सुरक्षित ठेवण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

दैनंदिन जीवनातील विविध उदाहरणांच्या माध्यमातून सायबर फसवणूक कशी ओळखावी, तसेच फसवणूक झाल्यास कोणती खबरदारी घ्यावी, याची माहिती सोप्या भाषेत देण्यात आली. महिलांनीही विविध प्रश्न विचारून उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथील सायबर शक्ती क्लबच्या वतीने कराड परिसरातील शाळा, महाविद्यालये तसेच नागरिकांमध्ये सायबर जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. वाढत्या सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि सुरक्षित डिजिटल व्यवहारांच्या सवयी रुजविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

प्राचार्य डॉ. संजीव वाघ व उपक्रम समन्वयक डॉ. प्रियांका शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम सुरू आहे. क्विक हील फाउंडेशनच्या सौ. अनुपमा काटकर, अजय शिर्के, दिपू सिंग व सौ. गायत्री केसकर यांचे सहकार्य लाभत आहे.

महिलांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश पोहोचविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल जयजवान श्री गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले. मंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षातील सांस्कृतिक उपक्रमांसोबतच सायबर सुरक्षेसारख्या महत्त्वाच्या विषयावर जनजागृती करण्यात आली. या उपक्रमासाठी मंडळाचे अध्यक्ष सचिन औंधकर, उपाध्यक्ष अमोल पोकळे व खजिनदार संदीप कालेकर यांचे सहकार्य लाभले.